RNI No. MAHBIL /2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष ५, अंक ३९]     मंगळवार, जून २५, २०१९/आषाढ ४, शके १९४१     [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### पोलीस आयुक्त, नवी मुंबई

### अधिसूचना

### नवी मुंबई पोलीस आयुक्तालय खाद्यगृह नोंदणी नियम, १९९९ आणि सार्वजनिक करमणुकीच्या जागा चालविणे, नवी मुंबई १९९९, नियम ३ (ब).

**संदर्भ :—**(१) महाराष्ट्र शासनाचे क्र. एमआयएस—१२१५/प्र.क्र.—२/विशा—५, गृहविभाग, दिनांक २२-१२-२०१५.

(२) महाराष्ट्र शासनाचे क्र. एमआयएस—०११४/प्र.क्र.—४२६/विशा—५, गृहविभाग, दिनांक १२-०१-२०१६.

(१)

क्रमांक पोआ/नमुं/परवाना शाखा/अधिसूचना/६४६/२०१९.— राज्य शासनाचे पुर्व मंजुरीने आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ चे पोट-कलम ६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई बावीस) चे कलम ३३, पोट-कलम (१) चे खंड (एक्स ए) व (वाय) अन्वये पोलीस आयुक्त नवी मुंबई यांनी "खाद्यगृह सुरू करणे व चालविणे" या बाबत दिनांक ०६ मे, १९९९ रोजीच्या अधिसूचनेद्वारे केलेल्या "नवी मुंबई पोलीस आयुक्तालय खाद्यगृह नोंदणी नियम १९९९" या नियमांमधून "खाद्यगृह नोंदणी प्रमाणपत्र" परवाने जारी करण्याचे पोलीसांचे अधिकार रद्द करण्यात येत आहेत.

(२)

राज्य शासनाचे पुर्व मंजुरीने आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ चे पोट-कलम ६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई बावीस) चे कलम ३३, पोट-कलम (१) चे खंड (डब्ल्यू) व (वाय) अन्वये पोलीस आयुक्त नवी मुंबई यांनी "सार्वजनिक करमणुकीची जागा चालविणे" (वर्ग ब) मधील निवासी हॉटेल, अतिथी भवन किंवा निवास गृह आणि खाणावळ या सार्वजनिक करमणुकीची जागा सुरु करणे व चालविणे" याबाबत दिनांक ०६ मे, १९९९ रोजीच्या अधिसूचनेद्वारे केलेल्या "सार्वजनिक करमणुकीच्या जागा चालविणे, नवी मुंबई १९९९, नियम ३ (ब)" या नियमांमधून "लॉजींग" परवाने जारी करण्याचे पोलीसांचे अधिकार रद्द करण्यात येत आहेत.

नवी मुंबई,
दिनांक २१ जून २०१९.

**संजय कुमार,**
पोलीस आयुक्त, नवी मुंबई.

# THE COMMISSIONER OF POLICE, NAVI MUMBAI

## *NOTIFICATION*

The Navi Mumbai Police Commissionerate Eating Houses Registration Rules, 1999 and The Rules for keeping of the place of Public Entertainment Navi Mumbai Rules, 1999.

Ref :—(1) Govt. Order No. MIS-1215/P.N.2/Visha-5/Home Dept, dated 22/12/2015.
(2) Govt. Order No. MIS-1215/P.N.426/Visha-5/Home Dept, dated 12/01/2016.

**I**

In exercise of the powers conferred by sub-section 6 of Section 33 of Maharashtra Police Act. 1951 (Bom. XXII of 1951) and with the previous sanction of Govt. of Maharashtra, it is notified that the Rules called "The Navi Mumbai Police Commissionerate Eating Houses Registration Rules, 1999 *vide* Notiication, Dated 06/05/1999 including "Open or keep eating house" made by the Commissioner of Police, Navi Mumbai under clauses (xa) and (y) of Sub-section (*1*) of Section 33 of Maharashtra Police Act, 1951 are hereby cancelled.

**II**

In exercise of the powers conferred by sub-section 6 of Section 33 of Maharashtra Police Act, 1951 (Bom. XXII of 1951) and with the previous sanction of Govt. of Maharashtra, it is notified that the Rules called "The Rules for keeping of the place of public Entertainment Navi Mumbai Rules, 1999 3 (B)" *vide* Notification Dated 06/05/1999 including "Open or keep residential hotel, guest house or lodging and boarding house" made by the Commissioner of Police, Navi Mumbai under clauses (w) and (y) of Sub-section (*1*) of Section 33 of Maharashtra Police Act, 1951, are hereby cancelled.

SANJAY KUMAR,
Commissioner of Police,
Navi Mumbai.

Navi Mumbai,
Dated 21st June 2019.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.